# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद

## ९१ वे नाट्य संमेलन, २०११ रत्नागिरी

अखिल भारतीय माराठी नाट्य परिषदेच्या विद्यमाने रत्नागिरी येथे ९१ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन दि.२८ ते ३० जानेवारी, २०११ या तीन दिवसांच्या कालावधीत आयोजित करण्यात आले.

## शुक्रवार २८ जानेवारी २०११

शुक्रवार दिनांक २८ जानेवारी २०११ रोजी सायंकाळी ४.०० वा. च्या सुमारास ९१ व्या अ. भा. मराठी नाट्यसंमेलनाची सुरूवात कोकणातील बाज चढलेल्या जल्लोषपूर्ण नाट्यदिंडीने झाली. आगमनानंतर शंकर घाणेकर रंगमंच या मुख्य रंगमंच्याचे मा.श्री. आत्माराम भेंडे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. त्यानंतर स्वागत गीत व बालगंधर्व चित्रपटासंदर्भात चर्चा झाली. त्यानंतर अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या स्थानिक शाखेतर्फे ज्येष्ठ रंगकर्मिचे सत्कार करण्यात आले व रात्री संगीत रजनीचा कार्यक्रम संपन्न झाला. त्याचदिवशी डॉ. काशिनाथ घाणेकर रंगमंच (सावरकर नाट्यगृह) येथे नाट्यपरिषदेच्या एकांकिका स्पर्धेतील पारितोषिक विजेत्या एकांकिकांचे प्रयोग सादर करण्यात आले.

## शनिवार, दि. २९ जानेवारी, २०११

शनिवार दि. २९ जानेवारी २०११ रोजी सकाळी १०.०० मुख्य रंगमंचावर संमेलनाचा उद्घाटन सोहळा बालगंधर्व नांदीने सुरू झाला. त्यामध्ये आमदार तथा स्वागताध्यक्ष श्री. उदय सामंत यांनी निमंत्रीतांचे स्वागत केले. संमेलनाध्यक्ष श्री. रामदास कामत आणि नियोजित अध्यक्ष श्री. राम जाधव यांच्या अध्यक्षेतेखाली अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या ९१ व्या अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचा उद्घाटन सोहळा मा.श्री. अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री आणि अर्थ व नियोजन मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते पार पडला. त्यानंतर दु.३.०० वा. सांस्कृतिक कार्यक्रम, नाटय संगीत, बासरी वादन व परिसंवाद इत्यादी कार्यक्रम पार पडले. सायंकाळी ७.०० वाजता लावणी नृत्य व रात्री ८.३० वाजता कलारजनी हा विविध नाट्यकलाकारांचा सहभाग असलेला कार्यक्रम पार पडला. त्याचदिवशी दुपारी ३.००वा. आबा शेटये रंगमंच येथे एकपात्री अभिनय आणि डॉ. काशिनाथ घाणेकर रंगमंचयेथे विविध बालनाटये, परिसंवाद, दीर्घांक व रात्री ९.३० वाजता 'ययाती देवयानी' हे नाटक सादर करण्यात आले.

## रविवार दिनांक ३० जानेवारी २०११

रविवार दिनांक ३० जानेवारी २०११ रोजी शंकर घाणेकर रंगमंच येथे सकाळी १०.०० वा. पालखी नृत्य, दुपारी १२.०० वा. अभिरूप न्यायालय, दुपारी ४.०० वा. खुले अधिवेशन व समारोप सोहळा पार पडला. सायंकाळी ६.०० वा. शास्त्रीय नृत्य संगीताचा कार्यक्रम व रात्री ९.०० वा. 'बाजीराव मस्त मी' हे नाटक करण्यात आले. त्याच दिवशी सकाळी १०.०० वा. आबा शेटये रंगमंच येथे विषय नियामक मंडळाची सभा झाली. व त्यानंतर एकपात्री अभिनय सादर करण्यात आले. डॉ. काशिनाथ घाणेकर रंगमंच येथे सकाळी विविध मनोरंजनाचे कार्यक्रम, बालनाट्य, संमेलाध्यक्ष श्री. राम जाधव यांची प्रकट मुलाखत, एकाकिका इत्यादी कार्यक्रम सादर करण्यात आले.